# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०४/२०२६ (मंगळवार )**

---

## नॅशनल ज्युडीशियल अकॅडमी, भोपाल येथे फौजदारी न्यायव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापर या विषयावर झालेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी "AI in Policing" या विषयावर केले प्रभावी सादरीकरण

दिनांक २१/०४/२०२६ रोजी नॅशनल ज्युडीशियल अकॅडमी, भोपाल येथे फौजदारी न्यायव्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) चा प्रभावी वापर, त्यातील संधी व आव्हाने यावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद पार पाडली. भारत सरकारच्या Ministry of Home Affairs (गृह मंत्रालय) यांच्याद्वारे ही परीषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत न्यायव्यवस्था, पोलीस, अभियोजन विभाग, फॉरेन्सिक तज्ञ, कारागृह प्रशासन तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांचा व्यापक सहभाग नोंदविण्यात आला. विविध सत्रांद्वारे कृत्रिम बुद्धिमत्तेचा गुन्हे तपास, न्यायालयीन प्रक्रिया, अभियोजन, फॉरेन्सिक व कारागृह व्यवस्थापनामधील वापर यावर सखोल चर्चा करण्यात आली.

सदर परिषदेत "AI in Policing" या विषयावर मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सविस्तर माहिती देवुन प्रभावी सादरिकरण केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र शासनाचे MARVEL ( Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement ) या मॉडेल बाबत माहीती देवुन **(MARVEL) च्या माध्यमातून महाराष्ट्रासाठी मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या "Sovereign and Secure AI" ( सार्वभौम आणि सुरक्षित कृत्रिम बुद्धिमत्ता ) या संकल्पनेचे प्रभावी सादरीकरण केले.** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने

पोलीस यंत्रणा अधिक स्मार्ट, वेगवान व डेटा—आधारित होत आहे. मोठ्या प्रमाणातील डेटाचे विश्लेषण करून गुन्हेगारी पॅटर्न ओळखणे सहज झाले आहे असे त्यांनी सांगितले. तसेच स्मार्ट पोलीसींग सक्षम करण्यासाठी विकसीत केलेले AI आधारित तंत्रज्ञानामध्ये CDR,IPDR डेटा, CCTV व ड्रोन फुटेज (चेहारा प्रणाली ओळखणारे, वस्तु ओळखणारे तसेच वाहनांचे नंबर प्लेट ओळखणारे तंत्रज्ञान), बँकिंग व्यवहार, सोशल मीडिया, फॉरेन्सिक डेटा इत्यांदीचे विश्लेषण या बाबत सविस्तर माहीती दिली. Large Language Models (LLMs) द्वारे कायदेशीर दस्तऐवज तयार करणे, साक्षीदारांच्या जबाबांचे विश्लेषण करणे, तसेच केस डायरीचे संकलन करणे, Graph Neural Networks (GNNs) च्या मदतीने गुन्हेगारी नेटवर्कचे विश्लेषण करणे अधिक प्रभावी होत असल्याचे त्यांनी आपल्या सादरिकाणात सांगितले. “AI in Policing” या विषयावर मा. पोलीस अधीकक्षकांनी सखोल आणि मुद्देसुद सादरिकरण केले.

**नॅशनल ज्युडिशिअल अकॅडमी ही भारतातील उच्च न्यायव्यवस्थेसाठी प्रशिक्षण देणारी अग्रगण्य व प्रतिष्ठित संस्था असून, न्यायाधीश व न्यायिक अधिकाऱ्यांच्या क्षमता विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.**


WHAT DATA POWERS LAW ENFORCEMENT AI?
FIRs & Charge Sheets
CDR / IPDR
CCTV & Drones
Banking Trails
OSINT / Social Media
Prison Records
Telecom Metadata
Forensic Lab Reports
AI = Algorithm + Clean Validated Data + Domain Feedback Loop
NATIONAL JUDICIAL ACADEMY


NATIONAL
JUDICIAL
ACADEMY






## क्रिकेट सट्टा /बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्यांविरूध्द गुन्हा नोंद
## ७८ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन काटोल:—** दिनांक २०/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, काटोल हद्दीत अर्जुन नगर, वार्ड क्रं ९ काटोल येथे सजल सोमकुवर हा अर्जुन नगर चौकामध्ये त्याच्या घराजवळ बसुन टाटा इंडयीन प्रिमियर लिग २०२६ या सिरीजमधील टाटा इंडियन प्रीमियर लीग मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन च्या क्रिकेट सामन्यावर मोबाईल द्वारे लोकांकडुन पैसे घेवुन हार जीतचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशा विश्वसनिय माहीतीवरून पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता अर्जुन नगर काटोल येथे **आरोपी नामे १) सजल सुरेश सोमकुवर, वय २० वर्ष, रा. अर्जुन नगर, वार्ड क्रमांक ९, काटोल हा मिळुन आला.** सदर

आरोपीने अँड्रॉइड मोबाईल मध्ये आयडी तयार करून बेटींग साईटवरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले. **आरोपी क्रं १ हा आरोपी २) विनय उर्फ विनू राजेश्वर वर्मा, वय ३७ वर्षे, रा. खोजा लेआऊट, काटोल यांच्या सांगण्याप्रमाणे सदर जुगार खेळवत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.**

**पंचासमक्ष अरोपीच्या ताब्यातुन १) एक ॲडरॉइड मोबाईल किंमती १०,०००/— रुपये. २) एक ॲपल आयफोन मोबाईल किंमती ५०,०००/— रुपये.आणि ३) रोख रक्कम १८,०००/— रुपये असा एकूण ७८,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे १) सजल सुरेश सोमकुवर, वय २० वर्ष, राहणार अर्जुन नगर, वार्ड क्रमांक ९, काटोल २) विनय उर्फ विनू राजेश्वर वर्मा, वय ३७ वर्षे, राहणार खोजा लेआऊट, काटोल यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ४९ भान्यासं सह कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०७ गुन्हे नोंद. एकुण ३ हजार १८३ रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २०/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्ट्रापट्ट्री साहित्य व रोख रक्कम असा एकुण ३,१८३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे महादेव हनूमंतराव राउत, वय ५० वर्ष, रा. वडगाव, ता. समूद्रपूर, जि. वर्धा हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी कुणाल गोपीचंद उरकुडे, वय २० वर्ष, रा. सोनेगाव, ता. चिमूर, जि. चंद्रपूर ह.मु गोदावरी नगर, बुट्टीबोरी हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे वर १ गुन्हा नोंद **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी भिमराव शामरावजी तागडे, वय ५१ वर्ष, रा. घोगली कळमेश्वर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी १) नरेंन्द्र केशवराव ठाकरे, वय ५२ वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड, जि नागपूर २) राजेन्द्र लक्ष्मण विंचुरकर, वय ५८ वर्ष, रा. मदना, ता. नरखेड, जि. नागपूर ३) पुंडलिक मधुकर गुहे, वय ५२ वर्ष, रा. भिष्णुर, ता. नरखेड, जि. नागपुर ४) नितीन रामभाऊ बालपांडे, वय ३८ वर्ष, रा. लोहारीसावंगा, ता. नरखेड, जि. नागपुर हे सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे वर प्रत्येकी १ असे ४ गुन्हे नोंद, अशा ०७ आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०७ गुन्हे दाखल केले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १३ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २०/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन

**मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ११९९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे राजकुमार धनलाल कटरे, वय ३४ वर्ष, रा. गांगापुर झोपडपट्‌टी, ता. हिंगणा, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) ज्ञानेश्वर सोमाजी मसराम, वय ५० वर्षे, रा. खापरी, ता. उमरेड, जि. नागपुर २) सुरज दिनकर ठाकरे, वय ३२ वर्ष, कोलार जि. नागपुर ३) अविनाश सुभाष डुंभरे, वय ५४ वर्ष, रा. प्रभाग क्रमांक ०५, नविन वसाहत बोरी याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे १) महिला आरोपी २) रामलखन संपत पिल्लारे, वय ४० वर्ष, रा. भंडारबोडी, ता. रामटेक ३) राजू किशोंर प्रजापती, वय ४० वर्ष, रा. कांद्री माइन, ता. रामटेक याचेवर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे भुजिंग दशरथ गोलाईत, वय ४० वर्ष, रा. उमरी, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे नुरसिंग धमरसिंग अधरेले, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र १५, सरदार मोहल्ला, कळमेश्वर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे प्रकाश बाळक्रिष्णा शेंदरे, वय ३५ वर्ष, रा. टेकाडी, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे राज प्रदिप माहाल्ले, वय २१ वर्ष, रा. निरवा, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. अशा १३ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १३ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ८८ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ७७४० मिली देशी दारू असा एकुण ११९९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २१/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २२ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १२ आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी

आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १८५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने